# संगीत उत्तरक्रिया

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**संगीत उत्तरक्रिया : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# संगीत उत्तरक्रिया

# संगीत अुत्तरक्रिया

## अंक पहिला

### प्रवेश १ ला

(पहिले माधवराव पेशवे वाड्याच्या अंगणात अुभे आहेत.
अितक्यात बाहेरच्या बाजूस गलका अैकू येतो.)

**माधवराव –** पहारेकरी, दरवाजाबाहेर गलका कसला होत आहे?

**पहारेकरी –** काही विशेष नाही, सरकार! अेक वेडी आज चार पांच दिवस येअून, भिक्षा घातली तरी न घेता आत घुसण्यासाठी त्रागा करीत असते. येतीं–जातीं पोरेंटोरें तिची गंमत करून हसत खिदळत असतात, अितकेंच कायतें.

**माधवराव–** भिक्षा घातली तरी न घेतां वाड्यातच घुसू पाहते? काय, ती म्हणते तरी काय?

**पहारेकरी–** खुळीच ती, सरकार! तिचे बरळणें तें बरळणेंच. ती म्हणते, ‘या शनिवारवाड्याचा धनी कोण, तो मला हवा आहे! देवाने स्वप्नांत येअून मला सांगितलें की, त्याची अेकदा चांगली कानअुघाडणी कर म्हणून!’ असें विचारीत हसते, रडते, किंचाळते. ती कुठून आली, कुठे जाणार, आहे कोणाची, याची तिला स्वत:ला तरी शुद्ध आहे कीं नाही देव जाणे! पण रंग, भाषा, यांवरून दिसते आहे कोण्या चांगल्या घराण्यातील बाअी!

**माधवराव–** बोलवा तिला आत. ती तिची वेडी गंमत पाहण्याची आम्हांलाही अेक वेडी लहर आली आहे.

(पहारेकरी वेडीला आणतात.)

**माधवराव–** बाअी, तुम्हांला काय हवें आहे?

**वेडी–** (मोठ्याने हसून) तू अरे मला तूच हवा आहेस! जसा मला स्वप्नांत दिसलास तसाच, अगदी तसाच! शनिवार वाड्याचा धनी तो तूच! पण तुझे नांव काय?

**पहारेकरी–** हा! मर्यादा सोडून अरे तुरे करशील तर...

**माधवराव–** अं हं! दाबू नका तिला असे. सांगा आमचें नांव तिला. आम्ही थांबू तोपर्यंत ती जें जें विचारील तें तें सांगा.

**पहारेकरी–** बाअी श्रीमंत माधवराव पेशवे पंतप्रधान, ते हेच!

**वेडी–** पेशवे? माधवराव? बरं यांच्या वडिलांचे नांव?

**पहारेकरी–** श्रीमंत बाळाजीपंत अर्थात् नानासाहेब पेशवे!

**वेडी–** त्यांच्या वडिलांचं?

**पहारेकरी –** बाजीराव बल्लाळ पेशवे!

**वेही–** त्यांच्या वडिलांचं?

**पहारेकरी –** बाळाची विश्‍वनाथपंत भट. हेच पुढे पहिले पेशवे झाले.

**वेडी–** (हर्षभराने टाळ्या वाजवीत) भट? भट? तर मग तू मूळचा भटच आहेस? पुरें, झालं माझं काम! भटजीबुवा, मला सध्या पेशव्यांबिशव्यांशी काही काम नसून अेक तुझ्यासारखा भटजीच हवा होता! कारण मला अेक अुत्तरक्रिया करायची आहे, होय अुत्तरक्रिया! त्यासाठी भट हवा होता भट!

**माधवराव–** कोणाची अुत्तरक्रिया करावयाची आहे तुम्हांस? नीट शांत होअून बोला.

**वेडी–** कोणाची, कोणाची अुत्तरक्रिया म्हणून सांगू तुला? अरे, ‘शनिवार वाड्याचा जो धनी आहे, तोच भट बोलाव आणि आमची अुत्तरक्रिया कर! तरच आमच्या अंतराळात तळमळणाऱ्या अतृप्त जीवांना अुत्तम गति मिळेल. असें पानपती पडलेले सहस्त्रावधि अतृप्त वीरात्मे माझ्या स्वप्नात येअून ओरडत असतात. ते बघ माझे पतिराज, तो बघ माझा तनय! झुंजत पडले बघ रणात! ती बघ माझी मुलगी : अगं बाअीगं, घायाळ केली – रक्तबंबाळ केली ना रे त्या राक्षसांनी! त्या माझ्या



पतीची, मुलाची, मुलीची (पहारेकऱ्याकडे बोट दाखवून) तुझ्या बापाची, तुझ्या काकांची, (माधवरावांकडे बोट दाखवून) नि तुझ्या काकांची!

**माधवराव–** (दचकून) काय? आमच्या काकांची? भाअूसाहेबांची? अुत्तरक्रिया?

**वेडी –** होय त्याच तुझ्या चुलत्याची नि तुझ्या बापाची नि तुझ्या भावाची–विश्‍वासरावाची! अितक्यातच दचकतोस काय असा? आणखी अैक. अगं बाअी? पण माझ्या पायात बोचलं काय पुन्हा? काचा काचा? ज्या वाटेने पाअूल टाकावं त्या वाटेत पिचलेल्या बांगड्यांच्या काचांचा ढीग! घरोघर बांगडी फुटली. ते तुकडे पायात बोचून बोचून रक्तबंबाळ झालं नारे हें माझें हृदय! भटा, मला त्या फुटलेल्या लाखो बांगड्यांची अुत्तरक्रिया करायची आहे! त्या लाखांचीं नांवें अेका नांवात सांगू तुला? त्या लाखांचं अेक नांव–पानिपत! मला पानिपतची अुत्तरक्रिया करायची आहे! आणि त्या पानिपतच्या अुत्तरक्रियेचा भट तू!

**माधवराव–** बाअी, तू कोण, कुठली, वेडी आहेस की शहाणी आहेस तें तें काहीच कळत नाही. पण जर तू खरोखरच वेडी असशील तर तुझें हें वेड या आमच्या पेशवाअीतील सगळ्या शहाण्यांच्या शहाणपणाहून अधिक शहाणें आहे यात शंका नाही. निदान ज्या राज्यबुडावू वेडाने आमच्या दादासाहेबांना नि सखारामबापूंना आजकाल पछाडले आहे, त्या वेडापेक्षा जर हें तुझें पानपतच्या अुत्तरक्रियेचें वेड त्यांना पछाडले आहे. पण काय करू? या शहाण्यांच्या वेडांची बेडी माझ्या पायास ठोकली गेल्याने मी आजवर पंगु होअून पडलो! पण आता ती बेडी मी मोडली आहे. आता माझें मी सर्व पाहून घेतो. तू निश्‍चिंत रहा. ती पानपतची अुत्तरक्रिया मी करतो. तू जा नि आपल्या नातेवाअिकांची अुत्तरक्रिया तेवढी यथास्थित कर जा. तुला काय हवें तें साहित्य, दर्भांसुद्धा हें आमचे कोठीवाले पुरवितील.

**वेडी–** दर्भ? वेड्या, मला दर्भ नकोत, दळभार हवेत! अेकेका व्यक्तीच्या अुत्तरक्रियेस दर्भ पुरतात, पण अेखाद्या पानपतच्या अुत्तरक्रियेत दळभार लागतात दळभार–दर्भ नव्हेत! ह्यः ह्यः ह्यः आमच्या भटजीबुवांना अजून अुत्तरकियेचा अर्थच कळला नाही! अरे पहारेकरी, दिल्ली पानपत पुण्याच्या कोणत्या दिशेस आहे?

**पहारेकरी –** अुत्तरेस.

**वेडी –** हां हां. तर मग त्या अुत्तर दिशेस जिंकण्याची जी क्रिया ती अुत्तरक्रिया! आणि राक्षसांच्या हातून अुत्तर जिंकून घेताना जे जे पानपती रणी झुंजले, जे जे रणी पडले, त्यांचं अपुरं राहिलेलं तें कार्य, ती क्रिया, पुरी करणं म्हणजे पानपतची अुत्तरक्रिया करणं; आतां आलं कां ध्यानात?

**माधावराव–** बाअी, तुम्ही स्वत: पानपतास होता की काय त्या झुंजीत?

**वेडी –** ते मला काय विचारतोस? हे माझे, केस तुला दिसत नाहीत? (किंचाळून) पिशाच्च! पिशाच्च! अरे हे राक्षस मला नि माझ्या मुलीला केस धरून गरगर फिरवीत फरफट ओढू लागले ना? हे रक्ताळ डाग, हा ठणका, ते तुटलेले-तुडविलेले, राकटलेले, विस्कटलेले केस यांना विचार मी कुठे होते तें! अुत्तरक्रियेस तू भटजी मिळालास. पण थांब भटा, थांब-आधी अुत्तरक्रियेचें साहित्य जुळलं पाहिजे ना! यास्तव, वाजवा! आधी रणढोल वाजवा, फुंका! आधीं रणशिंगे फुंका, चेंदा! आधी त्या पिशाच्चांना चेंदा! हा नजीब, हा सादुल्ला, हा हाफीज, हा बंगष-आधीं त्यांची हाडकें न हाडकें मला द्या: आधी त्या समिधा, मी आग तू भट-नि मग कर ती अुत्तरक्रिया! वा, शेवटी, बेत तर ठीक जमला! (मोठ्याने हसत व टाळ्या वाजवीत) वेडाचा आनंद किती अपरंपार असतो! सहन होत नाही तो मला साऱ्या पुण्यांत, साऱ्या महाराष्ट्रात अशी नाचत फिरल्यावाचून या वेडगळ आनंदाच्या कळा कसल्या थांबायला! (डमरू वाजवीत गाणें गात नाचते.)

**सोनपत पानपत। तुमची आमची गेली पत।।**
**पादशशहा हिंदुपत घ्या घ्या सूड!।।**
**साप विंचू मुंगूस पाल।।**
**मराठ्यांनों करा वार।।**
**दिल्लीच्या बादशाहीचं पाडा रणांत धूड।।**
**मग अुत्तरक्रिया – आधीं भाअूंचा सूड।।**
**विश्वासाचा सूड! पानपतचा सूड!**

**माधवराव–** हें आता कोण मला भेटलें? ही वेडी-की पानपतच्या शल्याने बिद्ध झालेल्या महाराष्ट्राच्या हृदयातील-मूर्तिमंत वेदना? मी कोणाच्या किंकाळ्या



अेकल्या? या वेडीच्या का पानपतच्या सूडासाठी तळमळणाऱ्या माझ्या स्वत:च्या अुत्सुकतेच्या! भाअूसाहेबांची अुत्तरक्रिया! भाअूंची वैयक्तिक अुत्तरक्रिया, पार्वती काकूंच्या प्रेमवेड्या हटनटाने आजवर जी अपुरीच राहिली, ती आता काकूबाअी करू देवोत वा न देवोत! अुत्तर हिंदुस्थानात हिंदूंची सत्ता स्थापन करण्याच्या, भाअूंच्या अपुऱ्या अिच्छेचा अश्मा, महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या जरिपटक्याचे पदरात, असा पक्का बांधून, अबदाल्लीचे नाकावर टिचून, पानपतचें अुट्टे काढून अुत्तर हिंद जिंकण्याचें तें भाअूंचें कार्य, ती भाअूंची महाराष्ट्रीय अुत्तरक्रिया तरी मी यथाविधि संपादन करणार! भित्र्या शहाणपणाने बोथट झालेल्या, महाराष्ट्राच्या तरवारीची धार, पानपतच्या सुडाच्या सहाणेवर घासून, मी तिला ह्या वेडीसारखेंच वेड लावणार! कारण कीं:

**अतिघोर संकट बिकट झंजावादळी सहसा हता।**
**निबिड पंथी पंथि जातां बुद्धिची तमसावृता।।**
**धर्मरक्षणि देव दावी मतिमतांही मतिहता।**
**वीज वेडाचीच अैशा पेटवुनि पुढल्या पथा।।**

✦✦✦

## प्रवेश २ ला

**कोंडण्णा–** दिवस मोठे कठीण आले खरे! ही माधवराव बल्लाळ पेशव्यांची राजवट म्हणजे शुद्ध राकटपणाचं राज्य! त्यांत हंसायची चोरी, बसायची चोरी, गायची चोरी! अूठ की लढ, यांवाचून या झुंजारावांना दुसरें काही सुचत नाही. वास्तविक हा गडी कोण्या भांडकुदळ अेकांड्या शिलेदाराच्या पोटी जन्मास यायचा तो वाट चुकून श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या पोटी आला म्हणून राजा झाला, नाहीतर, राजेपण असं याच्यात काडीचंदेखील नाही. याचा आजा तो बाजीराव काय थोडा लढवय्या होता? पण मस्तानीच्या महालातील रंग लुटण्याची रसिक राजकळाही त्यांच्यात होती. याचा बाप नानासाहेब केवढा प्रतापी! अटकेपासून रामेश्वरापर्यंत नुसत्या निरोप्याकरवी कारभार यावा, दळभार हलावा. पण स्वत: स्वारी किती रंगेल, किती रसिक असे.

छट्, या माधवरावासारखा नीरस पेशवा झालाच नाही. हे शनिवार वाड्यात असले की, त्या राजवाड्याची राजकळा गेलीच म्हणून समजावं. अहो राजा म्हटला की, दहा गायकिणी, दहा नायकिणी, दहा गवय्ये, दहा बजवय्ये, दहा विनोदक, दहा विदूषक, दहा दास, दहा दासी सदा हसत खिदळत आहेत. गाणी नाचणी चालू आहेत, कोट्या कोटिक्रम, चुगल्या, चकाट्या पिटीत आहेत आणि त्यात रंगून राजा गादीवर लोळत आहे, असा शोभायचा, असा राजा त्या दादासाहेबांच्या पोटीच आला तर येअील! कारण ते दादासाहेब राजवाड्यात धनी असले की, आमच्यासारख्या कसलेल्या विदूषक विनोदकांच्या गुणांचं काहीतरी चीज होतं. पण हे आमचे माधवराव वाड्यात धनी झाले की, शनिवारवाड्याच्या रंगेल राजमंदिरास त्यांनी अेखाद्या अुदगीरचं रुक्ष रणमैदान करून सोडलंच म्हणून समजावं! ज्याच्या त्याच्या डोक्यावर यांच्या करड्या भुवअीची वाकडी तरवार सदा लटकलेली! अहो, राजांनीही लढाया मारल्याच पाहिजेत, पण त्या भाडोत्री घोडदळाकडून परस्परे माराव्या. राजेच जर सारखे स्वारीच्या घोड्यावर बसत राहिले तर राजगादीवर लोळत पडायचं कोणी? गोमाशांनी? अं, हे कोण? दादासाहेबांचे पुजारी धोंडण्णाशास्त्री? या. शास्त्रीबुवा या!

**धोंडण्णा–** (प्रवेशून) काय कोंडण्णाशास्त्री! अहो अहात कुठं? भरलीं, तुमचीं साऱ्यांची शंभर वर्षे भरली. अहो उत्तर हिंदूवर पानपतचा सूड घेण्यासाठी स्वारी करण्याचं माधवरावांनी निश्चित केलं!

**कोंडण्णा–** मरू देत त्यांना! पानपतचा म्हणे सूड घेणार. अशी काही पानपतची गेलेली पिढीची पिढी हे पुन: जिवंत करणार आहेत. विशी तिशीच्या आतच मरण्यास योग्य अशा या जनकोजी, विश्वासराव, भाअूसाहेब, यशवंतराव पवारासारख्या प्रजेचा महाराष्ट्रात सध्या नुसता पूर आला आहे. मरोत ते जाअून तिकडे दिल्लीकडे. पण पूर्व पुण्याअीच्या आयुष्याची दोरी बळकट असलेल्या आमच्या दादासाहेबांसारख्या, ताराअूसारख्या किंवा अस्मादिकांसारख्या अुपयुक्त जीवांस लवकर लवकर शिवण्याची, पेशवाअीची वाट लागेतो तरी मृत्यूची छाती नाही, अिच्छाही नाही. त्यातही आम्ही तर राजवाड्यातले अेक शास्त्री, ज्योतिषी, फारतर स्वारीचा मुहूर्त पाहून दिला की संपलं आमचं काम!



**धोंडण्णा–** पण शास्त्रीबुवा तुम्ही राज्यातले ज्योतिषीच नाही, तर अेक लढाअू जहागिरदार आहा. माधवरावांनी अशा झाडून साऱ्या अैतखाअू जहांगिरदारांस त्यांच्या जहांगिरीच्या कराराप्रमाणे स्वत: लढाअींवर जाणें भाग पाडण्याची सक्त आज्ञा सोडली आहे.

**कोंडण्णा–** तरीही मला ती आज्ञा लागू पडत नाही. कारण आमच्या आजोबांना मूळ बुंदेलखंडातून बाजीरावांनी अिकडे आणलं. तें वाड्यात ज्योतिषी म्हणून ठेवण्यास. पुढे आमचे वडील चार अुनाड शिलेदारांच्या नादी लागून लढाअीवर जाअू लागले नि त्यास स्वारीवर शंभर दोनशांचें पथक घेऊन नित्य जावें म्हणून त्या खर्चासाठीं ही जहागीर मिळाली. पण आजोबांनी मला त्या अुनाड व्यवसायात न घालता मूळची ज्योतिष विद्या नि शास्त्रविद्याच शिकविली. अरे ब्राह्मणांना घोड्यावर बसणें धर्मबाह्य म्हणून त्यांनी मला जन्मात घोड्यावर देखील बसू दिलं नाही. नानासाहेबांचे वेळी मलाही त्यांनी वाड्यातील ज्योतिषी म्हणूनच नेमलं आणि पुढं आमचा विनोदी गमत्या स्वभाव पाहून त्यांचं मनोरंजन करण्याचं अगदी अंतस्थ कामही आमचेकडेच दिलं. पुढे दादासाहेब आले नि त्यांनी आम्हांस साफ सांगून टाकलं की, तुला मी पेशव्यांच्या विनोदक विदूषकांचा नि दासदासींचा मुख्य विश्वासू सरदार नेमला आहे तू वाड्यातून हलत जाअू नकोस. पुरुषांत ज्योतिष सांगत जा, बायकांत पोथी पुराण वाचीत जा, सर्वांत हसवीत जा, स्वत: खात जा खिदळत जा, नि आमच्याकडे वाड्यातील झाडून साऱ्या अंतस्थ कुलंगड्याची वार्ता पोचवीत जा. बस ही आमची कामगिरी जोंवर आम्ही अेकनिष्ठपणं करीत आहो तोंवर आम्हांस स्वारीवर धाडणारे, नाही तर आमची जहांगीर जप्त करणारे हे माधवराव कोण?

**धोंडण्णा–** पण शास्त्रीबुवा हें शहाणपण या माधवरावास शिकवावं कोणी? अहो ते दादासाहेब शहाण्याचं अैकत नाही म्हणतात. पण ते निदान तुम्हां आम्हां शागीर्दांचं तरी अैकतात. परंतु या रावसाहेबांपुढं शहाण्याचं काय, शागीर्दांचं काय, कोणाचं काही चालत नाही. तो राघोबा पुरवला पण हा राघोबा नको. तुमची तरी हे सारें माधवरावांचे तोंडावर सांगण्याची छाती आहे का?

**कोंडण्णा–** छाती? अरे त्याच्या बापाबरोबर, प्रत्यक्ष नानासाहेबांबरोबर मांडीशी मांडी लावून नि हातावर हात मारून सहले खेळलेले आम्ही–आम्हांस हा